**एम.ए.सी.पी.क्र.२१५/२०२२**
CNR No.MHST01-002325-2022
(जोत्स्ना नितीन जाधव व इतर वि.
सेल्वाराज रसप्पन व इतर)

**निशाणी क्र.१३ खालील आदेशः–**

जाबदार क्र.२ यांची कैफियत रेकॉर्डवर घेणेकरीता हा अर्ज दाखल केला आहे.

२) निशाणी क्र.१३ वरील अर्ज व अर्जदारतर्फे दिलेले म्हणणे वाचले.

३) जाबदार क्र.२ यांच्या कथनानुसार प्रस्तुतकामी मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. तरी प्रकरणाचा गुणावगुणावर निर्णय होणेकरीता त्यांची कैफियत दाखल करुन घेणे आवश्यक आहे. कैफियत दाखल करणेची संधी न दिल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होईल. अर्जदाराने हरकत घेऊन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

४) जाबदार क्र.२ यांनी कैफियत दाखल करण्यास उशीर झाल्याचे कथन करुन कैफियत दाखल करणेची संधी मिळण्याची विनंती केली. अर्जदारातर्फे आक्षेप घेतला आहे. उशीर हेतुपुरस्सरपणे केल्याबाबत कायद्यामध्ये गृहीतक नाही. तसेच प्रस्तुतचा अर्ज मंजुर करुन जाबदार क्र.२ यांना कैफियत दाखल करण्याची संधी दिल्यास प्रकरण गुणदोषावर निकाली करणे सुलभ होणार आहे. उलटपक्षी अर्ज नामंजुर केल्याने जाबदार क्र.२ यांच्या हक्कावर गदा येवुन त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

(१) अर्ज (निशाणी क्र.१३) मंजुर करण्यात येतो.

(२) जाबदार क्र.२ यांना कैफियत दाखल करणेस झालेला उशीर माफ करणेत येतो.

(३) जाबदार क्र.२ यांची कैफियत प्रकरणात सामिल करुन घेण्यात यावी.

Digitally signed by NITIN HANMANTRAO JADHAV
Date: 2023.03.06 16:42:14 +0530

सातारा. (नि.ह. जाधव)
दिनांक – ०६/०३/२०२३. तदर्थ जिल्हा न्यायाधीश–२, सातारा